मौजा बाभळी, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथे पुरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संपादित जमिनीचा वाढीव मोबदला अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः गावठाण-२०१८/प्र.क्र.५७/र-१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २०.०३.२०१९

वाचा -

१. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.अकवा/न्यायप्रकरण/१०९९/प्र.क्र.१५२/अ-२, दि.२४.१२.२००३
२. विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र.उपाय/पुनर्व/भू.सं.२/कावि/१२६२/२०१६, दि.१९.०५.२०१६
३. विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र.उपाय/पुनर्व/भू.सं.१/कावि/३८८/२०१७, दि.२८.११.२०१७
४. विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र.उपआ/पुनर्व/भुसं-१/कलि/कावि-२३०/२०१८, दि.२.७.२०१८
५. विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र.उपआ/पुनर्व/भुसं-१/कलि/कावि-४५१/२०१८, दि.३.११.२०१८
६. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक पुनर्वि -२०१८/२२४५/प्र.क्र.१८०/ब-१ दि. १५.३.२०१९

प्रस्तावना -

मौजा बाभळी, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथे पुरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी श्री.श्रीकांत विश्वासराव तराळ यांची ०.६० हे.आर जमीन संपादित करुन, विशेष भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, दर्यापूर यांनी भूसंपादन प्रकरण क्र.९/४७/२००८-०९ प्रकरणी दि.२७.९.२०१० रोजी अंतिम निवाडा पारित करण्यात केला. श्री.तराळ यांनी भूसंपादन अधिनियम १८९४ चे कलम-१८ अन्वये, वाढीव मोबदल्याकरिता मा.दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर), दिवाणी न्यायालय, दर्यापूर येथे दावा एलएसी क्र.०४/२०११ दाखल केला. सदर प्रकरणी मा.दिवाणी न्यायालयाने दि.१८.१०.२०१३ रोजी न्यायनिर्णय दिला. मा.दिवाणी न्यायालयाच्या आदेशाविरुध्द शासनाच्यावतीने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे प्रथम अपील क्र.१०९४५/२०१५ दाखल करण्यात आले. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी प्रथम अपील क्र.१०९४५/२०१५ प्रकरणी दि.१२.४.२०१७ रोजी न्यायनिर्णय दिला असून, शासनाच्यावतीने दाखल अपील खारीज केले. यास्तव श्री.श्रीकांत विश्वासराव तराळ यांची संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा अंतिम मोबदला अदा करण्यासाठी, विभागीय आयुक्त, अमरावती यांनी मागणी केलेला रुपये ७,२९,६७५/- इतका निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

तद्नुसार, मौजा बाभळी, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथे पुरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संपादित करण्यात आलेल्या श्री.श्रीकांत विश्वासराव तराळ यांच्या जमिनीचा अंतिम मोबदला अदा करण्यासाठी रुपये ७,२९,६७५/- (अक्षरी रुपये सात लक्ष एकोणतीस हजार सहाशे पंचाहत्तर फक्त) इतका निधी विभागीय आयुक्त, अमरावती यांना निधी वितरीत करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

सदर बाबीवरील खर्च भागविण्यासाठी, संदर्भ क्र.६ च्या आदेशानुसार पुनर्विनियोजनाद्वारे निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. विभागीय आयुक्त, अमरावती यांना रुपये ७,२९,६७५/- इतका निधी BEAMS प्रणालीवर निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही कक्ष अधिकारी, (म-११) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी करावी.

२. यासाठी येणारा खर्च, "मागणी क्र.सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणार्थ सहाय्य, ०२-पूर चक्रीवादळे, (९३) इतर (९३) (०३) पुरामुळे बाधीत झालेल्या व्यक्तिंच्या पुनर्वसनाकरिता रस्ते, घरे इ. बांधकामासाठी संपादन केलेल्या/अधिग्रहित केलेल्या जमिनीबद्दल नुकसानभरपाई देणे (अनिवार्य), ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (२२४५ ०१८२)" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षात BEAMS प्रणालीवर उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

वित्तीय शिस्तीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांनी खालील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१) विभागीय आयुक्त, अमरावती यांनी भूधारकास अदा करण्यासाठी परिगणना केलेली रु.७,२९,६७५/- एवढी वाढीव मोबदला रक्कम अंतिम व योग्य असल्याची खातरजमा करुन, सदर रक्कम भूधारकास तात्काळ अदा करावी.

२) विभागीय आयुक्त, अमरावती यांनी मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार वाढीव मोबदला मंजूरीचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

३) अदा करण्यासाठी मंजूर केलेल्या बाबी व्यतिरिक्त अन्य बाबींवर अनुदान खर्च होणार नाही यांची विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दक्षता घ्यावी.

४) या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेला निधीपेक्षा जास्त निधी कोणत्याही परिस्थितीत खर्च होणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

५) मा. न्यायालयाचा निर्णयानूसार वाढीव मोबदला अदा करण्यास विलंब होणार नाही यांची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

६) सदरच्या आदेशातील नमूद मुख्यलेखाशीर्ष मागणी क्र.सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणार्थ सहाय्य, ०२-पूर चक्रीवादळे, (९३) इतर (९३) (०३) पुरामुळे बाधीत झालेल्या व्यक्तिंच्या पुनर्वसनाकरिता रस्ते, घरे इ. बांधकामासाठी संपादन केलेल्या/अधिग्रहित केलेल्या जमिनीबद्दल नुकसानभरपाई देणे (अनिवार्य), ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (२२४५ ०१८२) या लेखाशीर्षातर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेला कोणताही निधी शिल्लक रहाणार नाही अथवा सदर आदेशान्वये प्राप्त होणारा निधी संबंधित यंत्रणेच्या कोणत्याही Operational Bank Account /PLA (स्वीय प्रपंची खाते) मध्ये जमा करून ठेवण्यात येणार नाही, याची संबंधित अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

७) मुख्यलेखाशीर्ष मागणी क्र.सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणार्थ सहाय्य, ०२-पूर चक्रीवादळे, (९३) इतर (९३) (०३) पुरामुळे बाधीत झालेल्या व्यक्तिंच्या पुनर्वसनाकरिता रस्ते, घरे इ. बांधकामासाठी संपादन केलेल्या/अधिग्रहित केलेल्या जमिनीबद्दल नुकसानभरपाई देणे (अनिवार्य), ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (२२४५ ०१८२) या लेखाशीर्षांतर्गत संबंधित संनियत्रण अधिकारी यांनी होणाऱ्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवून शासनाच्या प्रचलित लेखा पध्दतीनुसार ते महालेखापाल यांना सादर करावेत. तद्नुषंगाने या लेखाशीर्षाखाली होणाऱ्या खर्चाचा ताळमेळ, विनियोजन लेखे इत्यादि कामे संबंधितांनी प्रचलित पध्दतीप्रमाणे करावीत.

८) यासंदर्भातील खर्च विवरणपत्रे/ अहवाल शासनास न चुकता सादर करण्यात यावीत. वरील निधीसंबंधित खर्च ताळमेळाची विवरणपत्रे महालेखापाल कार्यालयाच्या Reconcillation Slip सह शासनास न चुकता सादर करावीत.

९) संबंधित अधिकारी यांनी या आदेशान्वये वितरीत निधीचे उपयोजन प्रमाणपत्र Utilisation Certificate महालेखापाल कार्यालय,संबंधित जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त/शासनास तातडीने सादर करावे.

१०) सदर आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. अनौस.७३/व्यय-९/२०१९, दि.७.३.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२०१५५९४३४८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=831ad18b348f1d88937e4f113316b4ad736a2c6a66b967f985fda6404a710d52, cn=Dayanand S Munjale
Date: 2019.03.20 16:08:46 +05'30'

(द.शं.मुंजाळे)
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत,

१. विभागीय आयुक्त तथा मुख्य नियंत्रण अधिकारी (पुनर्वसन), अमरावती विभाग, अमरावती
२. उप आयुक्त (पुनर्वसन), अमरावती
३. जिल्हाधिकारी, अमरावती
४. उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, दर्यापूर
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१, नागपूर-२ (२ प्रतीत)
६. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१, नागपूर-२ (२ प्रतीत)
७. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती
८. महसूल व वन विभाग, कार्यासन म-११/ ब-१/ पीएसी, मंत्रालय, मुंबई ३२.
९. निवडनस्ती कार्यासन र-१२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.